महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी: ०२० -२६३६०९४१

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेच्या संपूर्ण तयारीकरिता (पूर्व व मुख्य परीक्षा मुलाखत) नामवंत खाजगी संस्थेमार्फत प्रशिक्षण देणे योजना

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता प्रशिक्षण कार्यक्रमात प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test- CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून या योजनेच्या लाभासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

## प्रशिक्षणार्थींची सर्व साधारण पात्रता

१. उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा तसेच उपरोक्त परीक्षेसाठी शैक्षणिक अर्हता, वय व अर्जात नमूद केल्यानुसार इतर पात्रता व अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

२. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील कमीत कमी ५ वर्षे रहिवासी/अधिवासी असला पाहिजे.

३. उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा अर्ज करते वेळेस उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate) तसेच अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Cast Validity) असणे बंधनकारक आहे.

५. उमेदवारांच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ८ लक्ष किंवा रु. ८ लक्षापेक्षा कमी असावे.

६. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येणार नाही.

७. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण कार्यक्रम कोणत्याही कारणास्तव सोडावयाचा असल्यास त्या उमेदवारास प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रशिक्षणाकरिता संस्थेने केलेला संपूर्ण खर्च आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस परत द्यावा लागेल.

८. उमेदवाराने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. उमेदवारास एकाच वर्षी सदर योजनेचा व आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक –प्रशिक्षण -२०२० / प्र.क्र. ७५ / का. -०९ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० अन्वये, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा व मुलाखत तयारीकरिता प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत देणे योजना या दोन्ही योजनेचा एकत्रित लाभ घेता येणार नाही.

१०. प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराने धुम्रपान करणे, अंमली पदार्थाचे सेवन करणे, मद्यपान करणे, उद्धट वर्तन असे गैर प्रकार केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येऊन कायदेशीर/ दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

११. PVTG जमातीच्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

१२. नियमानुसार मुली व दिव्यांग, अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर

१३. महिला व दिव्यांग, अनाथ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा अनुसूचित जमातीतील गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

१४. समान गुण असणा-या उमेद्वारांमधून खालील निकषांवर आधारित उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१.उमेदवाराचे वय २. उच्च शिक्षण

या योजने बाबत अधिक माहितीसाठी कृपया आदिवासी विकास विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक –प्रशिक्षण -२०१२/ प्र.क्र. १५८ (भाग -२)/ का. १७, दिनांक : १५ जुलै, २०१४, शासन शुद्धिपत्र क्रमांक –प्रशिक्षण -२०१९/ प्र.क्र. २१/ का. ०९, दिनांक : २५ मार्च, २०१९ व शासन शुद्धिपत्र निर्णय क्रमांक –प्रशिक्षण -२०१९/ प्र.क्र. २१/ का. ०९, दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९ वाचा. तसेच उमेदवारास आवेदन पत्र भरणे (Application Form) तसेच सबंधित इतर तांत्रिक अडचणी असल्यास अधिक माहितीसाठी वेबसाईट वर देण्यात आलेल्या हेल्पलाईन क्रमांक व ईमेल आय. डी. वरच संपर्क साधावा.

❖ **सूचना : सदर योजनेसाठी https://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंकवरून ऑनलाईन स्वरूपातच केलेले अर्ज स्वीकारले जातील.**

**सदर योजनेसाठी आवश्यक शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रे पुढीलप्रमाणे : -** (सादर कागदपत्रे ही फक्त PDF फॉरमॅटध्ये Size between 200 - 300 KB मध्ये स्कॅन केलेली असावीत.)

१. अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

२. अनुसूचित जमातीचे वैधता मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

३. दहावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

४. बारावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

५. पदवी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

६. डोमिसाईल मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

७. आधारकार्ड मूळ छायांकित स्कॅन प्रत

८. आधारकार्ड लिंक असलेले मूळ बँक तपशील – पास बुक स्कॅन प्रत

९. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत

१०. सिविल सर्जन यांनी निर्गमित केलेला मूळ अपंगाचा दाखला स्कॅन प्रत

११. उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला मूळ अनाथाचा दाखला स्कॅन प्रत.

१. अद्यावत फोटोग्राफ (Only JPG or JPEG; Size between 80 – 100 KB)

२. अद्यावत स्वाक्षरी (Only JPG or JPEG; Size between 30 - 50 KB)

वर नमूद सर्व कागदपत्रांसोबत सबंधित भरलेल्या मूळ अर्जाची प्रत, परीक्षा प्रवेश पत्र इ. बाबी डाऊनलोड करून ठेवावी व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळेस डाऊनलोड केलेल्या अर्जाची प्रत देणे आवश्यक आहे. प्रवेश घेते वेळेस जर उमेदवारांनी उपरोक्त नमूद कागदपत्राची पूर्तता न केल्यास या योजनेचा लाभ देता येणार नाही. उपरोक्त नमूद सबंधित भरलेला अर्जाची मूळ प्रत, परीक्षा प्रवेश पत्र, नमूद सर्व मूळ कागदपत्रांच्या पडताळणी करण्याच्या "अटी व शर्ती" च्या अधीन राहून गुणवत्ता यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येईल. मूळ अर्जासह सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रतीचा एक सेट अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयात जमा करावा लागेल यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

प्रवेश परीक्षा, प्रवेश पत्र, गुणवत्ता यादी / प्रतीक्षा यादी, कागदपत्रे तपासणी/पडताळणी, तसेच इतर प्रक्रिया बाबतची सर्व अद्यावत माहिती www.trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल. याबाबतची कोणतीही माहिती कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक स्वरुपात/लेखी कळविण्यात येणार नाही.

सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी व अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास उचित बदल करून त्यास मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

## प्रशिक्षणार्थींसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी महत्वाच्या सुचना

चाळणी परीक्षेत (CET) प्राप्त गुणांवर आधारीत उमेदवारांनी Registration Form भरताना निवडलेल्या विद्यापीठनिहाय (९ विद्यापीठ) प्रत्येकी 25 उमेदवारांची गुणवत्ता यादी व 25 उमेदवारांची प्रतिक्षा यादी trti.maharashtra.gov.in या website वरच प्रकाशित केली जाईल. सदर यादी प्रसिद्ध झाली आहे कि नाही याबाबत उमेदवाराने website ला जाऊन तपासावे. TRTI कडून निकालाबाबत कुठलाही पत्रव्यवहार किंवा दुरध्वनीद्वारे आपणास संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

विद्यापीठनिहाय (९ विद्यापीठ) २५ उमेदवारांची गुणवत्ता यादी व २५ प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी trit.maharashtra.gov.in वर जाहीर केलेल्या कालावधीत आपल्या नजीकच्या जात पडताळणी समिती कार्यालयाकडे खालील कागदपत्रांसह उपस्थित राहून कागदपत्रे तपासून घ्यावीत व संबधित कार्यवाही पूर्ण करावी.

अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयामार्फत विद्यापीठनिहाय (९ विद्यापीठ) २५ उमेदवारांची गुणवत्ता यादी व २५ प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची विहीत मुदतीत कागदपत्र पडताळणी करण्यात येईल. trti.maharashtra.gov.in या website वर जाहिर केलेल्या शेवटच्या मुदतीपर्यंतच निवड यादी व प्रतिक्षा यादीतील २५ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करून घेण्याची संधी उपलब्ध असणार आहे.

जर २५ गुणवत्ता यादीतील व २५ प्रतिक्षा यादीतील उमेदवारास काही अपवादात्मक परिस्थीतीत बंधनकारक असलेले कागदपत्र कमी असेल तर त्याने अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे ते विहीत मुदतीत सादर करणार

असल्याचे अर्ज करुन त्या मुदतीतच ते सादर करणे बंधनकारक आहे. तो अर्ज स्विकृत /अस्विकृत करणे याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त, आसंप्रसं, पुणे यांचेकडे राहील. याबाबत इतर उमेदवारांचे आक्षेप ग्राहय धरले जाणार नाही.

प्रवेश (Admission) घेण्याची अंतीम मुदत trti.maharashtra.gov.in या website वर जाहिर करण्यात येईल. शेवटच्या मुदतीपर्यंतच गुणवत्ता यादीतील २५ उमेदवारांना प्रवेश (Admission) घेण्याची संधी असणार आहे. विहीत मुदत संपल्यावर प्रतीक्षा यादीतील २५ उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांची निवड झाल्यानंतर तात्काळ विद्यापिठातील प्रशिक्षण संस्थेत रुजू होणे बंधनकारक असेल व ७ दिवसाच्या आत रुजू करण्याचे हमीपत्र या कार्यालयास जमा करून जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल.

**अपवाद** – महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा इतर स्पर्धा परीक्षेच्या मुलाखत किंवा इतर बाबी संदर्भात समस्या उद्भवल्यास त्याची कारणमिमांसा करून योग्य निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणास ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे परंतु प्रशिक्षणार्थी गंभीर आजारी पडणे, अपघात होणे, इतर स्पर्धा परीक्षांना उपस्थित राहणे (नैसर्गिक आपत्ती/कौटुंबिक समस्या/वैद्यकीय कारण) या कारणामुळे कोचिंग क्लासेसला अनुपस्थित असल्यास अपवादात्मक परिस्थितीमध्ये (संबधित अनुपस्थितीचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र/ परीक्षेचे प्रवेशपत्र सादर करणे अनिवार्य आहे.) प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

जर कोणत्याही उमेदवारास निवड प्रक्रियेतील कोणत्याही मुद्द्यावर काही शंका असल्यास cevt.trti@gmail.com वर विहीत नमून्यात अर्जाद्वारे विचारणा करण्यात यावी. दूरध्वनीद्वारे संपर्क करून कोणत्याही शंकांचे निरसन करण्यात येणार नाही. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी एकूण नऊ विद्यापीठांचा (पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, मुंबई विद्यापीठ, मुंबई, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे श्री कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट समावेश केलेला आहे. सदर संस्थेस सामान्य अध्ययन या विषयाची पूर्व + मुख्य परीक्षा तसेच मुलाखत तयारी व वैकल्पिक विषय तयारी, व्याख्यातांचे मानधन, स्टडी मटेरियल, नोट्स (वाचन साहित्य) टेस्ट सेरीज, आवश्यक वर्तमानपत्र, मासिके, पुस्तके, स्टेशनरी इ. पुरविणे तसेच प्रशिक्षणाच्या इतर अनुषंगिक खर्च यासाठी फी अदा करण्यात येईल.

- **प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात येणाऱ्या सोई – सुविधा**

१. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या व विद्यापीठाने प्रवेश दिलेल्या उमेदवारास रु. ६०००/- प्रती माह विद्यावेतन देण्यात येईल.

२. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारांस एकदाच रु. ६०००/- पर्यंत किमतींचा पुस्तक संच खरेदीसाठी रक्कम त्यांच्या बँक खाती वर्ग करण्यात येईल.

३. प्रशिक्षणार्थींची प्रती माह किमान ७५ टक्के हजेरी असणे बंधनकारक आहे. प्रवेश घेतलेल्या विद्यापीठांकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच प्रशिक्षणार्थींच्या बँक खाती विद्यावेतनाची रक्कम DBT द्वारे वर्ग करण्यात येईल. कोणत्याही प्रशिक्षणार्थींने प्रशिक्षणास उपस्थित न राहता अथवा ७५ टक्के पेक्षा कमी हजेरी असल्यास विद्यावेतनासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेवर दबाव आणल्यास सदर प्रशिक्षणार्थींस अपात्र ठरवण्यात येईल.

४. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा निःशुल्क व अनिवासी असल्याने उमेदवारांना सदर प्रशिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(हंसध्वज सोनवणे)

सहसंचालक